# कॅलिफोर्नियात साजरा झाला अभिनव 'वन डे' गणेशोत्सव


तबल्याची साथ करताना सतीश तारे.

**प्लेझंटन : अमेरिकेत विविध उद्योग – व्यवसायांसाठी विसावलेल्या मराठी भाषिकांनी एकत्रित येऊन स्थापन केलेल्या ईस्ट बे मराठी मंडळाने अनोख्या पध्दतीने गणेशोत्सव साजरा करुन आपल्या मातृभूमीशी असलेल्या अतूट नात्याला पुन्हा एकदा उजाळा दिला. दैनिक ऐक्यच्या इंटरनेट आवृत्तीचे वाचक असलेली ही मंडळी गेली पाच वर्षे निरनिराळे उपक्रम राबवत आहे.**

गणेशोत्सव साजरा करण्यासाठी कॅलिफोर्नियातील प्लेझंटन शहरात नितीन गांधी यांच्या निवासस्थानी मंडळाच्या कार्यकर्त्यांची बैठक झाली. याहू ग्रुपचा वापर करुन मंडळाची कार्यकारिणी निवडण्यात आली. त्यात प्रमुखपदी प्रसाद देशमुख यांची एकमताने निवड करण्यात आली.


कार्यक्रमात सहभागी झालेले ईस्ट बे मराठी मंडळाचे पदाधिकारी

सौ. अंजली व नितीन गांधी, विलास ठुसे, सौ. नेहा कुलकर्णी, सौ. वर्षा उपाध्ये, सौ. शारदा कुलकर्णी, सौ. अश्विनी व किरण नाईक, सौ. नीता व शिरीष पाटील, सौ. दीपाली हर्षे, सौ. गौरी अभ्यंकर, सौ. चारुता व मिलिंद वैद्य, सौ. वंदना व श्रीपाद चिंचणकर, शार्दूल जेवळीकर, सौ. योगिनी पारखी, सौ. अंजली करंदीकर, सौ. निवेदिता फडणीस, सौ. अंजली इनामदार, सौ. शिल्पा खेर, सौ. अनुपमा भोंगळे, सौ. दीपाली देशपांडे यांनी पुढाकार घेऊन दि. ११ सप्टेंबर रोजी शहरातील व्हेटरन्स मेमोरिअर बिल्डिंगमध्ये 'वन डे' गणेशोत्सव साजरा केला.



सौ. दीपाली हर्षे यांनी विलोभनीय सजावट केल्यानंतर विलास ठुसे यांच्या पौरोहित्याखाली गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली. सौ. शारदा व राहुल कुलकर्णी यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. त्यानंतर अथर्वशिर्षाची ११ आवर्तने झाल्यावर बॅबे आईस्क्रीमच्या संचालिका श्रीमती भारती परमार यांच्या सौजन्याने उपस्थितांनी मोदकांसह भोजनाचा आस्वाद घेतला.

कॅलिफोर्नियातील नामवंत गायक अजित कुलकर्णी व त्यांच्या कन्या सौ. अनुजा सुर्लकर यांनी मराठी सुगम संगीताचा 'भाव सरगम' हा बहारदार कार्यक्रम प्रेक्षकांची मने जिंकून गेला. सतीश तारे यांची तबल्याची साथ व सौ. सुरश्री रास्ते यांची की–बोर्डची जोड सर्वांची वाहवा मिळवून गेली. सौ. नेहा कुलकर्णी यांच्या खुमासदार निवेदनाने समारंभास आगळी–वेगळी रंगत आली होती. दुपारी चार वाजता उत्तर पूजा, आरती, वाटल्या डाळीचा प्रसाद देऊन 'गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या' च्या गजरात गणेशोत्सवाची सांगता झाली.

वसंतराव सरदेशपांडे यांच्या हस्ते 'भाव सरगम' च्या कलाकारांचा सत्कार करण्यात आला. विश्वनाथराव कुलकर्णी यांच्या हस्ते लकी ड्रॉ च्या विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.

'वन डे' गणेशोत्सवाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विलास पाटील, सौ. वर्षा उपाध्ये, सौ. अश्विनी नाईक, सौ. योगिनी व रोहन पारखी, सौ. गौरी अभ्यंकर, सौ. शिल्पा खेर, सौ. अंजली इनामदार यांनी परिश्रम घेतले.

**वेबसाईटला भेट देण्याचे आवाहन**

ईस्ट बे मधील मराठी भाषिकांना सामावून घेण्याच्या उद्देशाने गणेशोत्सवाच्या मुहूर्तावर ट्राय व्हॅली मराठी मंडळाचे नाव बदलून ईस्ट बे मराठी मंडळ असे नाव देण्यात आले आहे. नितीन गांधी यांनी मंडळाच्या वेबसाईटसाठी सुविधा उपलब्ध करुन दिल्यानंतर विलास ठुसे यांनी तात्काळ मंडळाची www.ebmm.org ही वेबसाईट तयार केली आहे. संघभावनेचा व सहकार्याचा एक सुंदर अविष्कार असलेल्या गणेशोत्सवाची छायाचित्रे पाहण्यासाठी वेबसाईटला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


कार्यक्रमाचा आस्वाद घेताना भारतीय बांधव.

# पुनर्रचनेबाबत लोकप्रतिनिधींनी लेखी म्हणणे देण्याच्या राष्ट्रवादीच्या सूचना

**सातारा : राज्यातील विधानसभा मतदारसंघाच्या पुनर्रचनेमुळे अनेक मातब्बर अडचणीत आले आहेत. पुनर्रचनेबाबतची लोकप्रतिनिधींची भूमिका जाणून घेण्यासाठी दि. २८ सप्टेंबरपर्यंत लेखी म्हणणे देण्यास पक्षश्रेष्ठींनी सांगितले आहे. त्यानंतर पुनर्रचनेमुळे पक्षाच्या नफ्या-तोट्याचा विचार करुन यासंदर्भातील पक्षाची भूमिका ठरविली जाणार असल्याचे विश्वसनीय वृत्त आहे.**

पुनर्रचनेची माहिती लोकप्रतिनिधी व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना व्हावी यासाठी दि. २३ सप्टेंबर रोजी मुंबईत महत्वपूर्ण बैठक झाली. त्यात विधानसभा मतदारसंघाची होणारी रचना, लोकसंख्या आणि आरक्षणे यासंदर्भात प्रामुख्याने माहिती देण्यात आली. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात पुनर्रचनेमुळे काही बदल होणार आहेत. या बदलांचा पक्षाला होणार फायदा आणि तोटा याचा अहवाल तयार केला जाणार आहे. विद्यमान लोकप्रतिनिधींच्या भूमिका जाणून घेण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसने त्यांना दि. २८ सप्टेंबरपर्यंत मुदत दिली आहे.

राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्षांकडे हे म्हणणे लेखी स्वरुपात जमा करण्यात येणार आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी दि. २९ सप्टेंबर रोजी हे म्हणणे प्रदेशाध्यक्षांच्या उपस्थितीत होणाऱ्या बैठकीत जिल्हाध्यक्ष सादर करणार आहेत. लोकप्रतिनिधींचे म्हणणे आल्यानंतर त्याचा अहवाल तयार करण्यात येऊन पक्षाची पुनर्रचनेबाबतची भूमिका स्पष्ट करण्यात येणार आहे.

# कोणतीही मशागत न करता कामेरीत शेतकऱ्याने घेतले बहारदार आल्याचे पीक


कडुलिंबाच्या बियांचा कीटकनाशक म्हणून वापर करून दोन फूट वाढलेले आल्याचे पीक.

**सातारा : कोणत्याही स्वरुपाची मशागत न करता कामेरी येथील हणमंत विठोबा घाडगे यांनी २० गुंठे क्षेत्रात बहारदार आल्याचे पीक घेतले आहे.**

केवळ पाण्याच्या खाचरामध्ये आलेल्या आल्याच्या पिकाची सध्या परिसरामध्ये चर्चा सुरु आहे. हणमंत घाडगे यांनी २० गुंठे क्षेत्रामध्ये ३ ट्रेलर शेणखत, ५ ट्रेलर गव्हाचे काड शेतामध्ये टाकले आहे. त्यास पूरक असे ५ पोती बायोमील हे सेंद्रीय खत व पोते निंबोळी पेंड टाकले आहे.

आल्याचे पीक २ फूट उंचीचे असून त्यांनी कडुलिंबाच्या बियांची फवारणी केली. यामुळे या पिकावर कोणताही रोग पडलेला नाही. दत्तात्रय हणमंत घाडगे यांना त्यांचे गुरु मयेकर महाराजांचा कृपाशिर्वाद लाभल्याचे त्यांनी सांगितले. जनता उद्योग समुहाचे शिल्पकार व नाफेडचे संचालक विलासराव पाटील– वाठारकर यांनी घाडगे यांना सहकार्य केले आहे.

# मुसळधार पावसामुळे पिकांची हानी

**पाटण : गेल्या ५ दिवसांपासून पडलेल्या मुसळधार पावसामुळे तालुक्यातील पूल, फरशा, मोऱ्या, साकव, सार्वजनिक रस्त्यांसह खरीप हंगामातील सर्व पिकांची मोठ्या प्रमाणात हानी झाल्याचे आज ओसरलेल्या पावसानंतर दिसून येऊ लागले आहे.**

गेल्या ५ दिवसांपासून तालुक्यात पडलेल्या पावसाने अतिवृष्टीचे सावट निर्माण झाले होते. कोयना विभागासह तालुक्याच्या विविध भागात कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे कोयना नदीवरील संगमनगर, निसरे, मुळगाव येथील पूल पाण्याखाली गेले होते. जोरदार पाण्याच्या प्रवाहामुळे संगमनगर व मुळगाव पुलाचे कठडे आणि दोहो बाजूंचा भराव खचून गेला आहे. निसरे फरशी पुलावर अनेक लहान-मोठे खड्डे पडले असून ५ दिवस पाण्यामुळे या पुलावरून वाहतूक होऊ शकली नव्हती. या उलट पुलावरील पाणी ओसरुनही झालेल्या दुरवस्थेमुळे वाहतूक सुरळीत होण्यास अडथळे निर्माण झाले आहेत. तारळे विभागातील साकव व फरशी पुलांची केलेली डागडुजी पुन्हा मोडकळीस आली आहे. त्या विभागातही पावसाचा जोर ओसरुनही वाहतूक सुरळीत होण्यास अडथळे आले आहेत.

५ दिवसांपासून पडत असलेल्या पावसामुळे पाटण ते नवारस्ता, नेरळे ते मोरगिरी, चाफोली फाटा ते दिवशी बुद्रुक, तारळे ते घोट, आवर्डे ते मुरूड, नवारस्ता ते ढेबेवाडी घाटातील कठडे व रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली आहे. पाटण-सडावाघापूर मार्गे तारळे जाणाऱ्या रस्त्यावरील बांधवट ते वजरोशीपर्यंतच्या रस्त्याची व संरक्षक कठड्यांची या पावसामुळे दुर्दशा झाली आहे. या सर्व रस्त्यांची गेल्या १५ दिवसांपूर्वी बांधकाम व सार्वजनिक बांधकाम विभागाने डागडूजी करून ते वाहतुकीस खुले केले होते. त्यानंतर थोड्याच कालावधीत पुन्हा त्यांची दुरवस्था झाल्यामुळे संबंधित विभागाने या रस्त्यांची व प्रमुख फरशी पूल, साकवांची दुरुस्ती करून वाहन-धारक प्रवाशांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी नागरिकांतून जोर धरू लागली आहे.

जुलै आणि ऑगस्ट महिन्यात झालेल्या मुसळधार अतिवृष्टीतून तालुक्यातील २० टक्के खरीप पिकांना जीवदान मिळाले होते. ती सर्व पिके या पावसाने जमीनदोस्त झाली आहेत. या तालुक्यातील प्रमुख खरीप पीक म्हणून भात पिकाकडे पाहिले जात होते. ते पीक मुसळधार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे जमिनीवर कोसळले आहे. घेवडा, सोयाबीन, भुईमूग, धना, कारळा, ज्वारी ही सर्व पिके पाण्याने कुजून, वाऱ्याने पडून आणि मातीत झडून गेल्यामुळे शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे. शासनाने पाटण तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून खरीप हंगामातील सर्व पिकांना सरसकट रोखीने भरपाई देऊन शेतकऱ्यांचा शेतसारा माफ करावा आणि सार्वजनिक रस्ते, पूल, फरशा, मोऱ्या, सार्वजनिक इमारतींची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी अधिकाधिक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांतून केली जात आहे.

# नवसाची अशीही परतफेड



**चिंचणेर वंदन : सातारा विधानसभा मतदार संघातून कॉंग्रेस आघाडीचे उमेदवार श्रीमंत शिवेंद्रसिंहराजे भोसले हे विजयी व्हावेत यासाठी जैतापूरचे कार्यकर्ते रामचंद्र जगताप यांनी ग्रामदैवत गणपतीला साकडे घातले होते. श्री. शिवेंद्रसिंहराजे विजयी झाल्यास यात्रेत त्यांची पेढेतुला करण्याचा नवस त्यांनी केला होता. काही दिवसांपूर्वीच त्यांनी शिवेंद्रराजेंची पेढेतुला करून नवस फेडला.**

जैतापूरचे ग्रामदैवत गणपती असून अनंत चतुर्दशीला गावची यात्रा असते. यावर्षी यात्रेचे औचित्य साधून माजी सरपंच व विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीचे चेअरमन रामचंद्र जगताप यांनी या सोहळ्याचे आयोजन केले होते.

गावाच्या विकासासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या आ. श्रीमंत शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची पेढ्यांनी तुला करण्यात आली. शिवेंद्रसिंहराजे यांच्या समर्थकाच्या नवसपूर्ती निमित्ताने गावात यावेळी तालुक्यातील प्रमुख कार्यकर्तेही उपस्थित होते.

# खंडकऱ्यांना जमिनी परत मिळणार

## ५७ वर्षे सुरु असलेल्या लढ्याची अखेर



**फलटण : महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची जमीन खंडकरी शेतकऱ्यांना परत करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरुध्द महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे दाखल केलेली याचिका शुक्रवारी फेटाळण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांना सर्वोच्च न्यायालयात जाण्यास म नाई करण्यात आल्याने आपल्या जमिनी परत मिळविण्यासाठी ५७ वर्षे सुरु असलेला खंडकऱ्यांचा लढा अखेर यशस्वी होऊन खंडकऱ्यांना जमिनी मिळण्यात कोणतीही अडचण राहिली नाही. जलसंपदामंत्री ना. श्रीमंत रामराजे यांनी घेतलेल्या परिश्रमाला यश आले आहे.**

महामंडळाच्या कामगारांनी दाखल केलेली याचिका औरंगाबाद खंडपीठाचे न्या. ए. पी. देशपांडे व न्या. वासंती नाईक यांनी फेटाळली. याचिकाकर्त्यांना सर्वोच्च न्यायालयात जाण्यास परवानगी नाकारल्याने न्यायालयात एकही अर्ज अथवा याचिका प्रलंबित नाही. त्यामुळे राज्यातील खंडकरी शेतकऱ्यांना जमीन वाटपाची प्रक्रिया सुरु करण्यात राज्य सरकारला कुठलीही अडचण उरलेली नाही.

**राष्ट्रपतींची परवानगी मिळविण्यात यश**

महाराष्ट्रातील हजारो खंडकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत मिळाव्यात यासाठी राज्य सरकारने जलसंपदा मंत्री ना. श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर समिती स्थापन केली होती. या समितीचा अहवाल राज्य मंत्रिमंडळाने स्वीकारला होता. शेतकऱ्यांना जमिनी देण्यासाठी कायद्यात दुरुस्ती करण्याची आवश्यकता व सिलिंग कायद्यात दुरुस्ती करण्यासाठी राष्ट्रपतींची परवानगी मिळविण्यात ना. श्रीमंत रामराजे, खा. बाळासाहेब विखे-पाटील, कॉ. माधवराव गायकवाड यांना यश आले आहे. विधान सभेमध्ये दि. ३ ऑगस्ट २००१ रोजी महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ मध्ये सुधारणा करण्याचे विधेयक मांडून ते विधेयक विधानसभा आणि विधान परिषदेत मंजूर झाले.

**३३ याचिका खंडपीठाने फेटाळल्या**

विधेयक मंजूर झाल्यानंतर या विधेयकाच्या विरोधात महामंडळाच्या कामगार संघटनेने औरंगाबाद खंडपीठात विधेयकाविरुध्द जनहित याचिका दाखल केली होती. त्याचा निकाल लागून कामगारांचे म्हणणे फेटाळण्यात आले व शेतकऱ्यांना जमिनी देण्याबाबतच्या सरकारने केलेल्या कायद्याला सहमती दिली. यापूर्वी शेतकऱ्यांच्या विरोधातील ३३ याचिका औरंगाबाद खंडपीठाने १८ जुलै २००५ रोजी फेटाळल्या आहेत. कामगारांचे अनेक शेतकरी विरोधी दावे निकाली काढले आहेत.

महामंडळाच्या अनेक कामगारांनी दि. ९ जुलै ०५ रोजी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठासमोर रामराजे समितीचा अहवाल आम्हाला मान्य आहे असे प्रतिज्ञापत्र करुन दिले असून याबाबत मुख्यमंत्र्यांना कळविण्यात आले आहे. शासनाने खंडकरी शेतकऱ्यांच्या जमिनींचे वाटप त्वरित सुरु करावे, असे खंडकरी शेतकरी संघटनेच्यावतीने सरकारला कळविण्यात आले आहे. या विजयाचे खरे शिल्पकार जलसंपदामंत्री ना. श्रीमंत रामराजे, खंडकऱ्यांचे नेते कॉ. माधवराव गायकवाड, खा. बाळासाहेब विखे - पाटील, पणन मंत्री ना. हर्षवर्धन पाटील, ग्रामविकास मंत्री ना. विजयसिंह मोहिते-पाटील, आ. ससाणे असल्याचे लक्ष्मणराव नाईक निंबाळकर यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील हजारो खंडकरी शेतकऱ्यांना सिलिंग कायद्याप्रमाणे जमिनींचे वाटप होऊन गेली ४०-५० वर्षे आपल्या न्याय मागण्यांसाठी लढणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनींचे वाटप लवकरात लवकर करावे. हे वाटप मुख्यमंत्री ना. विलासराव देशमुख, महसूल मंत्री ना. नारायण राणे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष ना. शरद पवार, जलसंपदा मंत्री ना. श्रीमंत रामराजे, कॉ. माधवराव गायकवाड यांच्या उपस्थितीत व्हावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

खंडकरी शेतकऱ्यांच्या लढ्यासाठी कॉ. माधवराव गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली एल. पी. दातीर, आण्णासाहेब थोरात, काजळे, रावसाहेब काकडे, बी. डी. पाटील, दादासाहेब फडतरे, कुमार रणवरे, जगन्नाथ धुमाळ, लक्ष्मण बोंद्रे, दत्तोबा भोसले, साहेबराव बोबडे, डी. डी. वाघमोडे, हरिभाऊ रुपनवर, किसन झेंडे, रमेश देशपांडे, बापूसाहेब नाईक निंबाळकर, मुरलीधर बेलदार, पै. बाजीराव जगताप, कोठारी, किरण यादव, दीपक फौजदार, महादेव भोसले, गुलाबराव भोसले यांनी सातत्याने सहकार्य केले.

कामगार संघटनेच्यावतीने ॲड. के. जी. नावंदर, खंडकरी शेतकऱ्यांच्यावतीने ॲड. सुधीर कुलकर्णी, ॲड. काजळे, ॲड. विक्रांत निंबाळकर व सरकारच्यावतीने ॲड. राजेंद्र रघुवंशी यांनी कामकाज पाहिले.

महाराष्ट्रातील १३ मळ्यांवर सिलिंग मर्यादेपर्यंत सात हजार खंडकरी शेतकऱ्यांना पस्तीस हजार एकर जमिनीचे वाटप होणार असल्याचे सांगण्यात आले.

# फुलाभोवती घुटमळणारा इवलासा सूर्यपक्षी

**सातारा : अवघ्या दीड सेंटीमीटर फुलामधील मधुरस चाखणारा हा आहे तो जांभळ्या पाठीचा सूर्यपक्षी. फक्त चार सेंटीमीटर आकाराचा असणारा इवलासा पक्षी त्याच्या प्रत्येक हालचालीबरोबर रंग बदलतात आणि त्याच्या या रंगबदलामुळे तो आणखी देखणा दिसतो. वृक्षरोही कुळातील या पक्षाचे शास्त्रीय नाव आहे पर्पल रम्पड सनबर्ड. मराठीमध्ये याला शिंजीर असे नाव आहे.**



फुलांमधील मधुरस चोखण्यासाठी याच्या शरीराची रचना अशी नाजूक असते. त्याची चोच अत्यंत अणकूचीदार व लहान म्हणजे अवघी दीड सेंटीमीटर असते. फुलांमधील मधुरस घेताना याच्याकडून नैसर्गिकपणे परागीभवन होते. निशिगंध, जास्वंद, जाई, जुई, सूर्यफूल या फुलांमधील मधुरस आपल्या इवल्याशा चोचीने पिताना हा बागेत आढळतो. अत्यंत चळवळ्या असलेला हा शिंजीर काही सेकंदच एखाद्या फुलाभोवती घुटमळतो. सूर्योदयापासून आपली ही दिनचर्या सुरु करणारा हा सूर्यपक्षी मानवाचा निसर्गमित्र आहे. फुलांमधील मधुरस चाखताना सातारा शहरातील एका घराच्या गॅलरीतील नाजूक फुललेल्या वेलीवरील त्याचे टिपलेले छायाचित्र.